आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० जानेवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती दिल्यानं विरोधकांची सरकारवर टीका, कुठलाही वाद नसल्याचा महसूल मंत्र्यांचा दावा

- बदलापूर प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यूला पोलीस जबाबदार असल्याचा न्यायालयीन चौकशी अहवालाचा निर्वाळा

- मेळघाटमध्ये महिलेची धिंड काढल्याप्रकरणी ५ जणांना अटक

**आणि**

- महाराष्ट्राच्या मनन शर्मा या NCC छात्राला रक्षा मंत्री पदक

**<><><><><>**

राज्य सरकारनं रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती दिली आहे. आदिती तटकरे यांची रायगडच्या आणि गिरीश महाजन यांची नाशिकच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती झाली होती. मात्र प्रजासत्ताक दिनी या दोन्ही जिल्ह्यांमध्ये त्यांच्याच हस्ते ध्वजारोहण होईल, असा शासन निर्णय सरकारनं आज प्रसिद्ध केला.

**<><><><><>**

रायगड आणि नाशिक इथल्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती दिल्यावरून विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली. आज पालकमंत्री

बदलतील, तर उद्या उपमुख्यमंत्री बदलतील. बहुमत मिळूनही महायुती सरकारमध्ये धुसफूस सुरू आहे, अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

पालकमंत्रिपदाला स्थगिती देणं हा त्या पदाचा अपमान आहे, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे सांगितले. महायुती सरकारमध्ये मंत्रिपद आणि बंगल्यासाठी भांडणं होत आहेत, हे जनतेची सेवा कशी करणार याचा विचार जनतेनं करावा असं ठाकरे म्हणाले.

सैफ अली खान हल्ला प्रकरणावरून ठाकरे यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली.

दरम्यान पालकमंत्री पदावरुन महायुतीमध्ये कुठलेही वाद नसल्याचा दावा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. काही कुरबुरी असतील तर चर्चेतून मार्ग निघेल, असं ते म्हणाले. सत्ता न मिळाल्यानं विरोधक अस्वस्थ झाले आहेत. त्यातूनच ते नको त्या गोष्टींचे राजकारण करत असल्याचं बावनकुळे म्हणाले.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित चकमकीमध्ये झालेल्या मृत्यूला पाच पोलीस कर्मचारीच जबाबदार असल्याचा निर्वाळा न्यायालयीन चौकशी अहवालात दिला आहे. विरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. हा अहवाल मुंबई उच्च न्यायालयाला आज सादर करण्यात आला. आरोपीशी

झालेल्या झटापटीत या पाच पोलीस कर्मचाऱ्यांनी केलेला बळाचा वापर चुकीचा असून आरोपीच्या बोटांचे ठसेही बंदुकीवर आढळून आलेले नाहीत, असं अहवालात म्हटलं आहे. पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी आरोपीवर गोळीबार केल्याचा दावा संशयास्पद असल्याचंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे. आरोपी अक्षय शिंदे २३ सप्टेंबर २०२४ रोजी पोलिसांच्या चकमकीत ठार झाला होता. त्यानं पोलिसांची बंदूक हिसकावून घेऊन पोलिसांवर गोळीबार केल्याचा आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाल्याचा दावा पोलिसांनी केला होता.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटनाला चालना देण्याबरोबर रोजगार वाढीसाठी प्रयत्न केले जाणार असल्याचं पालकमंत्री नितेश राणे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितलं. अवैध धंद्यासह ड्रग्जमुक्त जिल्हा करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

विधीमंडळाद्वारे देशातल्या नागरिकांची सेवा करण्याची महत्त्वाची जबाबदारी पीठासीन अधिकाऱ्यांवर आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी केलं. पाटण्यात सुरू झालेल्या ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते आज बोलत होते. विधीमंडळात होणारे गोंधळ टाळून आणि त्यांचं पावित्र्य जपा.

संविधानानं घालून दिलेल्या मूल्यांच्या आधारे नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

लोकसभा, राज्यसभेसह देशाच्या विविध भागातून आलेले विधीमंडळांचे अध्यक्ष आणि इतर अधिकारी यात सहभागी झाले आहेत. याविषयी आकाशवाणीशी बोलताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले…

**होल्ड बाईट - राहुल नार्वेकर ( १२ सेकंद)**

संविधानाच्या अंमलबजावणीला ७५ वर्ष होत असताना संसद आणि राज्य विधीमंडळांचं संविधानाच्या बळकटीतलं योगदान यावर या संमेलनात विशेष चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ नेते शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शरद पवार यांच्या निवासस्थानी आज भेट झाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात यावेळी चर्चा झाली, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली. या भेटी दरम्यान काँग्रेसचे पदाधिकारी नसल्याने त्यांच्याशीही चर्चा करू, असंही पाटील म्हणाले.

**<><><><><>**

मेळघाटमध्ये एका महिलेला मारहाण करून तिची धिंड काढल्या प्रकरणी ५ आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिली आहे. त्या आज पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होत्या. या प्रकरणी समिती स्थापन करून सविस्तर अहवाल आठवडाभरात आयोगाला सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असं चाकणकर म्हणाल्या.

**<><><><><>**

देशातले युवावर्ग ही देशाची संपत्ती असून ते राष्ट्र उभारणी आणि समृद्धीमध्ये योगदान देतील, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं राष्ट्रीय छात्र सेनेच्या प्रजासत्ताक दिन शिबिर २०२५ ला संबोधित करताना बोलत होते. सर्व छात्रांनी एकता आणि राष्ट्रीय अखंडतेला आपल्या जीवनात प्राधान्य द्यावं, असं आवाहनही सिंग यांनी केलं. यावेळी छात्र सेनेतल्या विद्यार्थ्यांनी संरक्षण मंत्र्यांना मानवंदना दिली. काही छात्रांनी केलेल्या अद्वितीय कामगिरीमुळे त्यांना रक्षामंत्री पदकांनी गौरवण्यात आलं, त्यात महाराष्ट्राच्या मनन शर्मा या छात्राचा समावेश आहे.

**<><><><><>**

भारताच्या महिला आणि पुरुष संघानं पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद पटकावलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दोन्ही संघांचं अभिनंदन केलं आहे. ही विजयश्री अविस्मरणीय असून महाराष्ट्राला आपला अभिमान आहे, अशा शब्दांत

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही दोन्ही संघांचं कौतुक केलं आहे. या विजयानंतर क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे खेळाडूंशी संवाद साधत अभिनंदन केलं. राज्य सरकारने नुकताच खोखोसाठी दहा कोटींचा निधी दिला होता. विश्वविजेत्या ठरलेल्या दोन्ही संघांच्या कर्णधारांविषयी ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हॉईस कास्ट-**

*खो-खो विश्वचषकात दोन्ही संघांचे कर्णधार प्रियांका इंगळे आणि प्रतीक वाईकर हे भारताच्या विजयाचे शिलेदार ठरले. लहानपणापासूनच या दोघांमध्ये खोखोची आवड निर्माण झाली. पुण्यात पिंपरी-चिंचवड इथे राहणारी प्रियांका लहानपणी उत्तम धावपटू होती. तिच्या धावण्याच्या वेगामुळेच खो-खो संघात तिची निवड झाली. अवघ्या आठव्या इयत्तेत प्रियांकाने राष्ट्रीय स्पर्धेपर्यंत मजल मारली. ती अतिशय उत्कृष्ट धावपटू आणि बचावपटू आहे. आपल्या दमदार खेळामुळे प्रियांका प्रगतीचे उच्चांक गाठत गेली. आधी राष्ट्रीय स्पर्धेत आणि नंतर चौथ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी तिची निवड झाली. भारतीय महिला संघात झालेली निवड आणि नंतर मिळालेलं कर्णधार पद या संधीचं प्रियांकाने शब्दशः सोनं केलं आणि भारताला खो-खोचा विश्वचषक मिळवून दिला. पुरुष संघाचा कर्णधार प्रतीक वाईकर याने वयाच्या आठव्या वर्षापासून खो-खो खेळायला सुरुवात केली. या खेळाच्या बळावरच आधी अल्टिमेट खो-खो लीगमध्ये तेलुगु वॉरियर्सचं नेतृत्व केल्यानंतर महाराष्ट्राच्या संघाचंही त्याने नेतृत्व केलं. खो-खो विश्वचषक स्पर्धेतही त्याने आपल्या खेळाच्या आणि नेतृत्वगुणाच्या बळावर भारताला विश्वविजेता करण्यात योगदान दिलं आहे.*

**<><><><><>**

पुढच्या शंभर दिवसांत ५० हजार युवांना प्रशिक्षण देणार असल्याचं कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज सांगितलं. मुंबईसह नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती, पुणे इथं महाराष्ट्र इंटरनॅशनल केंद्र सुरू करण्यात येईल, असंही लोढा म्हणाले. कौशल्य

विकास विभाग आणि उच्च तंत्रशिक्षण विभाग नोकरी देणाऱ्या संस्थांबाबत सर्वसमावेशक कायदा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली. राज्यात सगळ्यात कमी किमान तापमान अहिल्यानगरात १० पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली. येत्या दोन दिवसात राज्यातलं हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**